<u>नियमित दिवाणी मुकदमा नं.३०/२०१६ मधील</u>

<u>निशाणी ८६ खालील आदेश</u>

<u>CNR No. MHSI04-000110-2016</u>

**( विनायक गवाणकर वि. एस.के.पाटील शिक्षण प्रसारक मंडळ पाट व.२५)**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी अभिलेखावर दाखल करुन सदरचा दावा चालणेस पात्र नाही असा मुद्दा काढून दावा काढून टाकण्यात यावा, अशी विनंती केलेली आहे.

२. प्रतिवादीतर्फे विद्वान विधिज्ञ यांचे कथनाप्रमाणे वादी यांनी दाखल केलेला प्रस्तुतचा दावा हा मुख्याध्यापक या अधिकारामध्ये दाखल केलेला आहे, परंतु वादी यांना कायदेशीर प्रक्रिया अवलंबून व चौकशी करुन त्यांना त्यांचे पदावरुन आणि कामावरुन बडतर्फ करण्यात आलेले आहे. त्यामुळे सद्यस्थितीमध्ये ते शाळेचे मुख्याध्यापक नाहीत. त्यामुळे दाव्यामध्ये केलेली मागणी पाहता ती कायद्याप्रमाणे देता येणार नाही. त्यामुळे प्रस्तुतचा दावा काढून टाकण्याची विनंती त्यांनी केलेली आहे.

३. सदरच्या अर्जास वादीतर्फे विद्वान विधिज्ञ यांनी निशाणी ८७ वर म्हणणे दाखल करुन सदर अर्जातील सर्व कथने नाकारलेली आहेत. त्यांचे कथनाप्रमाणे प्रतिवादी यांनी केलेली मागणी कायद्यातील तरतुदीप्रमाणे देता येणार नाही. तसेच सदरचा अर्ज कोणत्या कायद्यातील तरतुदीप्रमाणे दाखल केलेला आहे, ती देखील विनंती केलेली नाही. ज्यावेळी दावा दाखल केला त्यावेळी वादी हे मुख्याध्यापक होते आणि सध्या सेवानिवृत्त झाल्याने वादी यांनी केलेली विनंती व त्यानुसार दाव्यामध्ये झालेल्या दुरुस्ती नुसार प्रस्तुतचा अर्ज चालणेस पात्र आहे. वादी यांना सेवानिवृत्ती नंतरचे फायदे अद्याप मिळालेले नाहीत. प्रतिवादी यांनी स्वतःला अध्यक्ष, सचिव आणि कार्याध्यक्ष अशी पदे लावून घेतलेली आहेत. परंतु आजपर्यंत कोणत्याही

न्यायालयाने त्याबाबतची मान्यता दिलेली नाही. निव्वळ वादीस खर्चामध्ये टाकण्याकरीता प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला असल्याने आणि प्रतिवादीला सदरचा अर्ज देण्याचा अधिकार नसल्याने प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात यावा, अशी विनंती वादीतर्फे विद्वान विधिज्ञ यांनी केली.

४. अभिलेखावरील दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रस्तुत प्रकरणातील प्रतिवादी हे न्यायालयात हजर नाहीत. तसेच दिलेला प्रस्तुतचा अर्ज हा कायद्यातील कोणत्या तरतूदीप्रमाणे दाखल केलेला आहे याचा उल्लेख देखील प्रतिवादी यांनी त्यांचे प्रस्तुत अर्जाचे कामी केलेला नाही. प्रतिवादी यांनी नमुद केलेला घटनाक्रम पाहता त्यांचे कथनानुसार वादी यांना मुख्याध्यापक पदावरुन बडतर्फ करण्यात आलेले आहे. परंतु वादी यांचे कथनाप्रमाणे ते स्वतः सेवानिवृत्त झालेले आहेत. तसेच प्रस्तुत दावा दाखल करतेवेळी वादी हे मुख्याध्यापक म्हणून कार्यरत होते. यावरुन वादी हे प्रस्तुतचा दावा दाखल करताना मुख्याध्यापक या पदावर कार्यरत होते किंवा कसे ही बाब अभिलेखावर येणे गरजेचे, न्यायाचे असल्याचे दिसून येते. तसेच प्रतिवादी क्र. २ ते १३ आणि १४ ते २५ यांची देखील पदे कोणती आहेत याबाबत देखील पुरावा अभिलेखावर येणे गरजेचे आहे. त्यामुळे वादी व प्रतिवादी यांना प्रस्तुतकामी पुरावा सादर करण्याची न्यायिक संधी देणे आवश्यक असल्याचे दिसून येते. त्यामुळे प्रतिवादी कथन करतात त्याप्रमाणे वादी हे मुख्याध्यापक होते किंवा कसे ही बाब वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान होणाऱ्या पुराव्याअंती ठरणारी बाब आहे. त्यामुळे जर प्रतिवादी यांचा प्रस्तुतचा अर्ज नामंजूर केला तर प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट, प्रस्तुतचा अर्ज मंजूर केल्यास वादी यांचे अतोनात, कशानेही न भरुन येणारे नुकसान होण्याची शक्यता आहे. वादी यांना प्रस्तुतकामी

पुरावा सादर करण्याची संधी दिल्यास प्रतिवादी यांना देखील त्यांचा पुरावा सादर करण्याची न्यायिक संधी प्राप्त होणार नाही. प्रस्तुतचे प्रकरण  सन २०१६ पासून प्रलंबित आहे. त्या सर्व कारणांचा एकत्रित विचार करता प्रतिवादी यांचा प्रस्तुतचा अर्ज नामंजूर होण्यास पात्र असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**आदेश**

प्रतिवादी यांचा निशाणी ८६ वरील अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

सही/-

दिनांकः-३०.०६.२०२५.

(जी.ए.कुलकर्णी.)
दिवाणी न्यायाधिश ( क.स्तर )
कुडाळ.